॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर । बुधवार, दि. २२ जुलै २०२६ । वर्ष ७ वे । अंक ४६ वा । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAHMAR / 2012 / 47715 । 9420802145 । www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

सत्याच्या मार्गावर चालणारे नेहमी विजय मिळवतात.

## SPOT NEWS

### सिक्कीममध्ये बोगद्यात भूस्खलन; १२ ठार

● **नवी दिल्ली** – सिक्कीममधील एका बोगद्याजवळ सोमवारी दरड कोसळल्याने बोगद्याचे प्रवेशद्वार बंद झाले. या दुर्घटनेत २७ कामगार बोगद्यात अडकले आहेत. त्यातील १० जणांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे. मृतांपैकी तिघांची ओळख अद्याप पटलेली नाही तर १७ कामगार अजूनही आत अडकलेले आहेत. नामची जिल्ह्यातील मामरिंग येथील समरडुंग बोगद्यात बांधकामाचे काम सुरू होते. अडकलेल्या कामगारांची प्रत्यक्ष संख्या सुरुवातीला वर्तवण्यात आलेल्या २७ च्या अंदाजापेक्षा वेगळी असू शकते असे पोलिस अधीक्षक सोनम डोलमा यांनी सांगितले. बोगद्यात मिथेन वायूची गळती झाल्याचा संशय आहे. आत प्रवेश करताना अनेक बचावकर्त्यांना चक्कर आली आणि काहीजण बेशुद्धही पडले. यामुळे बचाव कार्यात अडथळा निर्माण झाला. जिल्हाधिकारी तमलिंग यांनी सांगितले की, दुपारी ३:४० च्या सुमारास प्रशासनाला अपघाताची माहिती मिळाली, त्यानंतर एनडीआरएफ, एसडीआरएफ, जिल्हा पोलिस आणि अग्निशमन दलाची पथके घटनास्थळी पोहोचली. बोगद्यात पटेल इंजिनिअरिंगचे २१ आणि एनएचपीसीचे ६ असे एकूण २७ मजूर अडकल्याची भीती आहे. पश्चिम बंगालमधूनही गॅस-प्रतिरोधक उपकरणांसह एक विशेष बचाव पथक आणले आहे.

### रशियाचा जहाजावर हल्ला, ४ भारतीय ठार

● **मॉस्को** – युक्रेनच्या किना-याजवळ एका व्यापारी जहाजावर रशियाने हल्ला केला. यात चार भारतीयांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर केंद्र सरकारने मंगळवारी भारतातील रशियाच्या राजदूतांना बोलावून तीव्र निषेध नोंदवला. भारताने या हल्ल्याला निंदनीय म्हटले असून आपल्या नागरिकांच्या मृत्यूसाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने नवी दिल्लीतील रशियन प्रभारी राजदूत व्लादिमीर लदानोव्ह यांना बोलावून या घटनेबाबत भारताचा तीव्र आक्षेप नोंदवला आणि स्पष्टीकरण मागितले आहे. युक्रेनच्या किनाऱ्यावर व्यापारी जहाजावर क्रू मेंबर्स म्हणून काम करत असताना या चार भारतीयांचा मृत्यू झाला. दोन देशांमधील युद्ध सुरूच असताना युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी या हल्ल्यासाठी रशियाला जबाबदार धरले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताने रशियाला चिंता कळवली आहे आणि या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. माहितीनुसार, १९ जुलैच्या संध्याकाळी युक्रेनच्या ओडेसा बंदरातून बाहेर पडताना एमव्ही गोल्डन लिओ या गिनी-बिसाऊचा ध्वज असलेल्या मालवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यात चार भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला. यात एक जण गंभीर जखमी झाला आहे.

# राजधानी दिल्लीत राडा, आंदोलन पेटले

## काँग्रेस आक्रमक । पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानासमोर ठिय्या, नेते ताब्यात

● **नवी दिल्ली । वीरभूमी**– नीट पेपरफुटीवर केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा मागण्यासाठी नवी दिल्लीत सुरू झालेल्या आंदोलनाने आता व्यापक स्वरूप धारण केले. आंदोलकांवर लाठीहल्ल्यानंतर अभिजीत दिपके यांनी जंतरमंतरवर आंदोलन तीव्र केले. आता या आंदोलनाला राजकीय बळ मिळत आहे. आज राहुल गांधी यांनी काँग्रेस खासदारांसह नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर जवळपास ३ तास ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर राहुल गांधी, प्रियंका गांधी, सपा नेते अखिलेश यादव यांच्यासह काँग्रेस, सपा खासदार, नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यावरून दिल्लीत चांगलाच राडा झाला असून, अडीच तासांनंतर राहुल गांधी, प्रियंका गांधी, अखिलेश यादव यांची सुटका केली. मात्र, या घडामोडीमुळे दिल्लीत आणि देशात आंदोलन चांगलेच पेटले आहे.



मंगळवारी दुपारी साडेतीनपासून पंतप्रधान निवासस्थानाबाहेर राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लिकार्जुन खरगे, सपा नेते अखिलेश यादव यांच्यासह जवळपास ३ तास ठिय्या आंदोलन केले. काही वेळांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विश्वासू मंत्री जितेंद्र सिंह राहुल गांधी यांच्या भेटीसाठी आले आणि यासंबंधी संसदेत चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. त्यामुळे आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. परंतु राहुल गांधी यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्या करीत ठिय्या आंदोलनावर ठाम राहिले. दरम्यान, ३ तासांनंतर पोलिसांनी राहुल गांधींसह काँग्रेस, सपा नेत्यांना जबरदस्तीने उचलले आणि त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पोलिसांनी प्रियंका गांधी यांना मंदिरमार्ग पोलिस ठाण्यात नेले तर राहुल गांधींना छत्रसाल स्टेडियममध्ये नेण्यात आले आणि अडीच तासांनंतर त्यांना रात्री उशिरा सोडले. यावरून दिल्लीत चांगलाच राडा झाला. काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. आता दिल्लीत सरकारविरोधात चांगलेच आंदोलन पेटले. दरम्यान, सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलिस स्टेशनला पोहोचल्या आणि प्रियंका गांधी यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांचीही सुटका झाली. राहुल गांधी यांना छत्रसाल स्टेडियममध्ये ठेवण्यात आले. त्यांचीही सुटका केली.

दरम्यान, पोलिसांनी लाठीमार करणे, विद्यार्थ्यांना जखमी करणे हे कोणाला मान्य नाही. देशाच्या विरोधी पक्षनेत्यांना जबरदस्ती उचलण्यात आले. केंद्र सरकारने धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे होता. नीटच्या मुद्यावर संसदेत चर्चा झाली पाहिजे. संपूर्ण भारत देश नीटच्या मुद्यावर विद्यार्थ्यांसोबत आहे, असे काँग्रेस नेते सचिन पायलट म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मंगळवारी रात्रीच जंतरमंतरवर दाखल झाले आणि त्यांनी दिपके यांच्यासह आंदोलकांशी संवाद साधला. दिल्लीत मी भाषण करण्यासाठी नव्हे तर युवा शक्तीला नमन करण्यासाठी आलो आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा पाहतोय एक सरकार जे आपल्या भविष्यावर लाठीचार्ज करत आहे. तुम्ही फक्त तरुण नाही तर या देशाचे भविष्य आहात, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### राजीनामा घेणारच; स्वस्त बसणार नाही

शांततेत आंदोलन सुरू असताना पोलिसांनी आम्हाला अटक केली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही जबरदस्तीने उचलून नेले. पण केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्याशिवाय काँग्रेस स्वस्थ बसणार नाही, असा इशारा काँग्रेसचे अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी दिला.

### शरद पवार यांनी घेतली दिपकेंची भेट


एकीकडे राहुल गांधी खासदारांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थाबाहेर धडकले. त्याचवेळी ज्येष्ठ नेते शरद पवार जंतरमंतरवर पोहोचले. यावेळी त्यांनी अभिजित दिपकेंसह आंदोलकांशी चर्चा केली आणि त्यांच्याकडून माहिती घेतली. तसेच विद्यार्थ्यांना केलेल्या मारहाणीवर चिंता व्यक्त केली.

### लाठीचार्जमुळे वातावरण तापले

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान लाठीचार्जवरून दिल्लीचे राजकारण वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. दरम्यान, काँग्रेसच्या ठिय्या आंदोलनाच्या वेळी काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांनी धर्मेंद प्रधान, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

## अकोलेत दमदार पाऊस, भंडारदरा ६९ टक्के भरले

● **अकोले । वीरभूमी**– उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यासाठी जीवनदायी ठरलेल्या भंडारदरा धरणातील पाणीसाठा ७.५ टीएमसी (७,६२५ दशलक्ष घनफूट) झाला असून धरण ६९.०७ टक्के भरले आहे. तर निळवंडे धरणात ३ टीएमसी (३,०३६ दशलक्ष घनफूट) पाणीसाठा असून ते ३६.४३ टक्के भरले आहे. आढळा धरणातील साठा ९२२ दशलक्ष घनफूट (८६.९८ टक्के) झाला असून तेही पूर्ण क्षमतेकडे वाटचाल करत आहे.



पुन्हा एकदा पावसाने जोर धरल्याने अकोले तालुक्यात समाधानाचे वातावरण असून धरणे लवकरच पूर्ण क्षमतेने भरतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

धरण परिसराने हिरवागार शालू पांघरला असून नयनरम्य वातावरण, फेसाळणारे धबधबे आणि पर्यटनस्थळांचे आकर्षण अनुभवण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र काही पर्यटक नियमांचे पालन करत नसल्याने अपघातांच्या घटना घडत असून त्यामुळे प्रशासनावर अतिरिक्त ताण येत आहे. पर्यटकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मंगळवारी सकाळी ६ वाजेपर्यंतची पावसाची नोंद (मिमी): भंडारदरा - ४५, घाटघर - ८५, पांजरे - ६१, वाकी - ४२, निळवंडे - १४, आढळा - २, अकोले - ६

मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत धरणांतील पाणीसाठा : भंडारदरा धरण : ६९.०७ टक्के (७.५ टीएमसी), निळवंडे धरण : ३६.४३ टक्के (३ टीएमसी), आढळा धरण : ८६.९८ टक्के (९२२ दशलक्ष घनफूट)

## ठाकरे गटाच्या सहा खासदारांविरोधातील तातडीच्या सुनावणीस 'सर्वोच्च' नकार

● **नवी दिल्ली । वीरभूमी**– लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत विलीन करण्यास दिलेल्या मान्यतेला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

मंगळवारी शिवसेनाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठासमोर या प्रकरणाची तातडीने सुनावणी करण्याची विनंती केली. मात्र, सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या पीठाने उद्याच किंवा शुक्रवारी तातडीने सुनावणी घेण्याचे कोणतेही आश्वासन दिले नसून विचार करू असे म्हटले आहे. ठाकरे गटाने लोकसभा सभापतींच्या निर्णयाविरोधात कलम ३२ अन्वये याचिका दाखल केली आहे. ६ खासदारांच्या विलीनीकरणानंतर ठाकरे गटाकडे आता लोकसभेत केवळ ३ खासदार उरले आहेत. तर या निर्णयामुळे शिंदे गटाच्या खासदारांची संख्या १३ वर पोहोचली आहे.

तातडीच्या सुनावणीचे कारण सर्वोच्च न्यायालयाने विचारले होते. यावर कामत यांनी लोकसभा अध्यक्षांनी ठाकरे गटाच्या ६ खासदारांना विरोधी पक्षात विलीन करण्यास मान्यता दिली आहे. हे खासदार पक्षाच्या मान्यतेशिवाय वेगळे झाले आहेत. यामुळे संसदेच्या चालू पावसाळी अधिवेशनात राजकीय पक्ष म्हणून आमचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे असे कारण दिले. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की आम्ही उद्या किंवा या आठवड्यात सुनावणीचे आश्वासन देऊ शकत नाही, मात्र यावर विचार करू.

१८ जुलै २०२६ रोजी लोकसभा सचिवालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार विलीन झालेल्या खासदारांची नावे : संजय देशमुख (यवतमाळ), संजय जाधव (परभणी), संजय दिना पाटील (मुंबई ईशान्य), नागेश पाटील-आष्टीकर (हिंगोली), ओमप्रकाश राजेनिंबाळकर (धाराशिव), भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी).

## दिल्लीत युवकांवर झालेल्या लाठीचार्जचा भाकपा-माले लिबरेशनच्या वतीने निषेध




● **अहिल्यानगर । वीरभूमी**– दिल्ली येथील जंतर-मंतरवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व शास्त्रज्ञ सोनम वांगचुक, विद्यार्थी नेत्या कॉ. नेहा बोरा, अभिजित दिपके आणि इतर आंदोलनकर्त्यांवर होत असलेल्या कथित लाठीचार्ज व दडपशाहीच्या निषेधार्थ भारतीचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशनच्या वतीने मंगळवारी (दि.२१ जुलै) जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने करून निषेध नोदविण्यात आला.

यावेळी आंदोलकांनी शिक्षणमंत्र्यांचा धिक्कार असो, मोदी सरकार हाय हाय, शिक्षण मंत्री राजीनामा द्या, आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही बंद करा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. निदर्शनानंतर आंदोलकांच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेचे नायब तहसीलदार मयूर बेरड यांच्या मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे. या आंदोलनात कॉ. राजेंद्र बावके, कॉ. राजू वैराळ, कॉ. मदिना शेख, कॉ. जीवन सुरुडे, कॉ. विनायक गोरखे, अनिल बोरसे,आकाश शिंदे, आसरू बर्डे, विजय राहीज, गणपत जाधव, बाळासाहेब खाडे, भास्कर जाधव, शिवाजी पवार, बजरंग गुंड, राहुल पवार आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

निवेदनात सोनम वांगचुक, कॉ. नेहा बोरा व इतर आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच नीट (NEET), यूजीसी-नेट, टीईटी, पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची स्वतंत्र न्यायिक चौकशी करावी, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पेपरफुटीविरोधी कठोर कायदा करावा, पाशवी बळावर लोकशाहीची गळचेपी थांबवा, शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

तसेच आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी व इतर नागरिकांना अडवण्याचाही प्रयत्न सरकार करत असून त्याचाही निषेध यावेळी करण्यात आला. यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करण्यात आली. आंदोलनकर्त्यांवरील दडपशाही, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराचा त्यांनी निषेध करण्यात आला.




# SPOT NEWS

## दिल्लीतील लाठीचार्जच्या निषेधार्थ अहिल्यानगरात एल्गार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि सकारात्मक बदल घडवून आणणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे तसेच राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा संदर्भातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अहिल्यानगरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी आंदोलनात सहभागी युवक-युवतींवर केलेल्या कथित लाठीचार्जचा निषेध व्यक्त करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. सामाजिक कार्यकर्ते सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक-युवती, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान सहभागी नागरिकांच्या हातात तिरंगा ध्वज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शहीद भगतसिंह यांच्या प्रतिमा होत्या. मोदी सरकार चले जाव, हमे चाहिए आजादी अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. युवकांनी डफाच्या तालावर गीत सादर करत घोषणाबाजी केली. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे फलकही झळकविण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणामुळे देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. या घटनेनंतर अनेक संघटनांनी आंदोलन केले. त्याच पार्श्वभूमीवर दिल्लीच्या जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पंतप्रधानांना निवेदन पाठविण्यात आले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तातडीने राजीनामा घेऊन विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णय न झाल्यास येत्या ३१ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

## खांबळी पाझर तलावातील पाणी उपशाविरोधात २४ जुलैला आक्रोश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील पळशी गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचा प्रमुख स्रोत असलेल्या खांबळी पाझर तलावातून कथितरीत्या बेकायदेशीर पाणी उपसा सुरू असल्याचा गंभीर आरोप पीपल्स हेल्पलाईन आणि स्थानिक नागरिकांनी केला आहे. अनधिकृत विद्युत मोटारी, बेकायदेशीर वीजजोडण्या आणि पाइपलाइनच्या माध्यमातून तलावातील पाण्याचा उपसा होत असल्याने पळशीसह परिसरातील सुमारे २०० ते २५० ग्रामीण व आदिवासी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्कावर गदा येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'कायदाभंजक पगारहमी नोकरशाहीविरोधी जनलोक खांबळी तलाव आक्रोश आंदोलन' आयोजित करण्यात आले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणाची माहिती लघुपाटबंधारे विभाग, महावितरण, महसूल प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना वेळोवेळी देण्यात आली होती. पीपल्स हेल्पलाईनने २३ एप्रिल २०२६ रोजी लेखी तक्रार दाखल करून बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने थांबविणे, अनधिकृत मोटारी व पाइपलाइन हटविणे, वीजजोडण्या तोडणे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे, अशा मागण्या केल्या होत्या. मात्र, तक्रारीनंतरही कोणतीही प्रभावी कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. जनतेच्या करातून वेतन, सुविधा आणि अधिकार मिळविणारे अधिकारी प्रत्यक्षात जनतेच्या प्रश्नांवर कार्यवाही करण्याऐवजी तक्रारींची केवळ पत्रव्यवहाराद्वारे देवाणघेवाण, टोलवाटोलवी आणि विलंब करत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे 'वेतनाची हमी आहे; मात्र जनतेच्या प्रश्नांच्या निवारणाची हमी नाही,' अशी परिस्थिती निर्माण झाली असून, यालाच संघटनेने 'पगारहमी नोकरशाही' असे संबोधले आहे. पीपल्स हेल्पलाईनने स्पष्ट केले आहे की, 'कायदाभंजक पगारहमी नोकरशाही' हा उल्लेख कोणत्याही एका अधिकारी किंवा कर्मचाऱ्याविरोधात नसून, कायद्याची अंमलबजावणी टाळणाऱ्या आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संपूर्ण निष्क्रिय प्रशासकीय प्रवृत्तीविरोधात आहे. सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी राखीव असलेल्या जलस्रोतांवर काही व्यक्तींनी अनधिकृतरीत्या ताबा मिळवून पाणी उपसणे म्हणजे ग्रामीण नागरिकांच्या जीवनाधिकारावर अतिक्रमण करण्यासारखे आहे. त्यामुळे खांबळी पाझर तलावाचे संरक्षण करणे ही लघुपाटबंधारे विभाग, ग्रामपंचायत, महसूल प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि महावितरण या सर्व संबंधित विभागांची संयुक्त जबाबदारी असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

# पारनेरच्या खंडोबा मंदिरातील १७४ वर्षांपूर्वीचा शिलालेख प्रकाशात

### अनाबाई आवटी पाटील यांच्या धार्मिक योगदानाची नोंद । मराठाकालीन समाज, स्थापत्य व भाषेवर प्रकाश

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पारनेर गावातील पूर्व वेशीजवळ, कालभैरव मंदिरासमोरील खंडोबा मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूच्या वरच्या भागात मराठाकालीन सहा ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी शिलालेख आढळून आला आहे. रंगरंगोटी, सिमेंटचा थर आणि वातावरणाच्या परिणामामुळे शिलालेखातील अनेक अक्षरे अस्पष्ट झाली असली, तरी छाप घेतल्यानंतर त्याचे वाचन शक्य झाले.

**शिलालेखाचे वाचन : १. श्री गणेशाय नमः श्री म्हाळसाकांताय न २. मः श्री म्हाळसाकांत चरणी तत्पर आनाबा ३. ई कोम आवजी प॥अ॥ को। पारनेर मो॥ म॥ ४. नीरंतर शके १७७४ परिधावी नाम संवत्सरे ५. वैशाख शुध्ध ३ गुरुवासरे मसाहाचा ६. कारखाना चालु आसे शुभ भवतु ॥१॥**

अर्थ : श्री गणेश व श्री म्हाळसाकांत यांना वंदन करून कसबे पारनेर येथील आवजी आवटी पाटील यांच्या पत्नी अनाबाई यांनी शके १७७४, परिधावी संवत्सर, वैशाख शुद्ध ३, गुरुवार (२२ एप्रिल १८५२) रोजी खंडोबा मंदिराच्या बांधकामाच्या शुभारंभ अथवा पूर्णत्वाची नोंद केली आहे. शेवटी शुभ भवतु असा मंगलाशय व्यक्त करण्यात आला आहे.

हा शिलालेख मराठाकालीन धार्मिक, सामाजिक, स्थापत्य आणि भाषिक परंपरेचा महत्त्वपूर्ण पुराभिलेख आहे. श्री म्हाळसाकांताय नमः या उल्लेखातून खंडोबा उपासनेचे महत्त्व स्पष्ट होते, तर चरणी तत्पर अनाबाई या शब्दांतून त्यांची अखंड भक्ती व्यक्त होते. स्त्रीचे नाव स्पष्टपणे नोंदविल्याने धार्मिक कार्यातील महिलांचा सहभाग अधोरेखित होतो.

आवजी आवटी पाटील यांच्या उल्लेखावरून संबंधित कुटुंब गावच्या वतनदार पाटील घराण्याशी संबंधित असल्याचे दिसून येते. त्यामुळे तत्कालीन धार्मिक जीवनाबरोबरच सामाजिक व प्रशासकीय व्यवस्थेचाही हा शिलालेख महत्त्वाचा पुरावा ठरतो.

शके १७७४, परिधावी संवत्सर, वैशाख शुद्ध ३, गुरुवार अशी संपूर्ण कालनोंद असल्याने या शिलालेखाचे दिनांकन २२ एप्रिल १८५२ निश्चित करता येते. कारखाना चालु आसे या वाक्यातील कारखाना हा शब्द त्या काळी मंदिराच्या बांधकाम किंवा स्थापत्य कार्यासाठी वापरला गेला असावा.

भाषिकदृष्ट्याही आसे, तत्पर, शुध्ध तसेच प॥, अ॥, को।, मो॥ यांसारखी संक्षिप्त रूपे मराठाकालीन लेखनशैलीचे दर्शन घडवतात. त्यामुळे लोकदेवता खंडोबाची उपासना, महिलांचा धार्मिक सहभाग, पाटीलकी व्यवस्था, स्थापत्य परंपरा आणि मराठी भाषेच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो.



- ■ गाव : पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
- ■ स्थान : पूर्व वेशीच्या आत, कालभैरव मंदिरासमोरील खंडोबा मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला वरच्या भागात
- ■ अक्षरपद्धती : उठाव स्वरूप ■ लिपी व भाषा : देवनागरी, मराठी
- ■ प्रयोजन : खंडोबा मंदिराच्या बांधकामाची स्मृती जतन करणे
- ■ मिती : शके १७७४, परिधावी नाम संवत्सर, वैशाख शुद्ध ३, गुरुवार
- ■ काल : २२ एप्रिल १८५२ ■ कारकीर्द : ब्रिटिश आमदनी
- ■ ग्रामनाम : पारनेर (पराशर) ■ देवता : श्री गणेश, श्री म्हाळसाकांत
- ■ व्यक्तीनाम : अनाबाई, आवजी आवटी पाटील
- ■ शिलालेखाचे वाचक : श्री. अनिल किसन दुधाणे, डॉ. शैलेंद्र भांडारे
- ■ संक्षेप : प॥=पाटील, अ॥=आवटी, को।=कसबे, मो॥=मोकदम, शुध्ध=शुद्ध
- ■ संशोधन, संकलन व वाचन : श्री. अनिल दुधाणे, शिलालेख वाचक, पुणे.

## अभ्यासाबरोबरच जीवनकौशल्ये आत्मसात करा; सातत्यपूर्ण प्रयत्नांतूनच यश मिळू शकते : भाऊसाहेब चासकर

**● अकोले । वीरभूमी–**

केवळ परीक्षेतील गुणांपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांनी समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता, ताणतणावांचे व्यवस्थापन, संवादकौशल्य आणि निर्णयक्षमता यांसारखी जीवनकौशल्ये आत्मसात करावीत. आयुष्यात अपयश आणि निराशेचे क्षण येतात, मात्र त्याने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करत पुढे जाणे आवश्यक असते, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर यांनी केले.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

अकोले महाविद्यालयात अकरावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना चासकर बोलत होते. अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य चांगदेव डोंगरे, पर्यवेक्षक विवेक वाकचौरे यावेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवावे, अवांतर वाचनाची सवय लावून घ्यावी आणि सोशल मीडिया व मोबाईलचा जपून व विवेकपूर्ण वापर करावा. चांगल्या मित्रांची संगत ठेवणे, रोज व्यायाम करणे आणि आरोग्याकडेही गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

आई-वडील, शिक्षक आणि निसर्ग यांच्याबद्दल मनात सदैव आदर व कृतज्ञतेची भावना ठेवावी. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना भेटून त्यांच्या कार्याविषयी जाणून घ्यावे. त्यांनी आपल्या आयुष्यातील संघर्ष आणि अपयशांचा सामना कसा केला, त्यांच्या विचारांची पद्धत कशी घडली, हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करत विद्यार्थ्यांनी अधिकाधिक चरित्रे आणि आत्मचरित्रे वाचावीत. थोर व्यक्तींच्या जीवनातून प्रेरणा घेत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, असेही सांगितले.

उपक्रमशील शिक्षक आणि कलाकार रमेश खरबस यांनी आपल्या खुमासदार सादरीकरणाने विद्यार्थ्यांची मने जिंकून घेतली. मिमिक्री, कविता वाचन आणि विविध कलाप्रकार सादर करत रमेश खरबस यांनी विद्यार्थ्यांचे मनोरंजनातून प्रबोधन केले.

प्रा. महेश पाडेकर, प्रा. सचिन चासकर, प्रा. उगले, प्रा. देशमुख आणि कला शाखेचे समन्वयक प्रा. टिक्कल यांनी स्वागत केले. प्रा. नितीन आरोटे यांनी सूत्रसंचालन केले.

## बडोदा बँकेच्यावतीने रामेश्वर विद्यालयात रंगभरण, निबंध स्पर्धा उत्साहात

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील वारी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री रामेश्वर विद्यालयात बँक ऑफ बडोदा या राष्ट्रीयकृत बँकेच्या ११९ व्या वर्धापन दिनानिमित्त वारी शाखेच्या वतीने विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रंगभरण व निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत एकूण ८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धा पाचवी-सहावी, सातवी-आठवी आणि नववी-दहावी अशा तीन गटांमध्ये घेण्यात आली. रंगभरण स्पर्धेच्या पहिल्या गटात रामेश्वर गोरे, कार्तिकी गाडेकर आणि राजवर्धन टेके यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. दुसऱ्या गटात पूर्वा वाघ, ईश्वरी कानडे आणि ज्ञानेश्वरी वाणी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. निबंध लेखन स्पर्धेत धन्वी कर्पे, अनुष्का गाडेकर आणि आयेशा शेख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.



■ छाया । जनार्दन जगताप

प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या नऊ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक्झाम पॅड देऊन गौरविण्यात आले, तर स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बँकेच्या वतीने पेनचे वाटप करण्यात आले.

यावेळी बँक ऑफ बडोदाच्या स्थापना दिनानिमित्त वारी शाखेकडून रोहित टेके यांच्या प्रयत्नातून बँकेच्या सीएसआर निधीतून शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वर्गखोल्यांमध्ये बसविण्यासाठी पाच सिलिंग फॅन भेट देण्यात आले. यावेळी या फॅनचे तसेच स्पर्धेतील पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष रोहित टेके, बँकेचे शाखा व्यवस्थापक सचिन राऊत, सहाय्यक व्यवस्थापक नितीन वाबळे, व्यावसायिक अधिकारी संदीप पवार, हेड कॅशियर राजेश वाघमारे, लोन ऑफिसर ईशा मिश्रा, शाखा सहाय्यक राम मोरे, शाळेचे मुख्याध्यापक शरीफ शेख, प्रताप टेके, शिक्षक कैलास शेळके, वसंत जाधव, सिताराम झुराळे, रवींद्र रासकर, तुकाराम जेठे, योगिता कर्डेल, शालिनी कर्पे, अनिसा पठाण आदी उपस्थित होते.

# जंतर-मंतरवरील कारवाईच्या निषेधार्थ पाथर्डीत आंदोलन

### सोनम वांगचुक प्रकरणी केंद्र सरकारवर टीका । शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलनकर्त्यांवर झालेल्या पोलिस कारवाईच्या निषेधार्थ पाथर्डी शहरातील स्व. वसंतराव नाईक चौकात विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी आंदोलन करून केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी वक्त्यांनी आरोप केला की, लोकशाही मार्गाने आपल्या मागण्यांसाठी उपोषण करणाऱ्या आंदोलनकर्त्यांना बळजबरीने ताब्यात घेण्यात आले, तर निषेधासाठी जमलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींवर लाठीमार करण्यात आला. ही लोकशाहीविरोधी भूमिका असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना वाचविण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असल्याची टीका करण्यात आली.

माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे म्हणाले की, सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाकडे तब्बल २० दिवस जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. शिक्षण क्षेत्राविषयी सरकारचे हे धोरण योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख म्हणाले की, दीर्घकाळ उपोषण करणाऱ्या व्यक्तीला अचानक ताब्यात घेणे हा निषेधार्ह प्रकार असून, सरकारने सोनम वांगचुक यांच्याशी चर्चा करून तोडगा काढायला हवा होता. या संपूर्ण प्रकरणाला केंद्र सरकार जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला.

आंदोलनानंतर आंदोलकांनी महसूल विभागाचे प्रदीप मगर यांच्याकडे निवेदन सादर केले.



■ छाया । अनिल खाटेर

या आंदोलनात आम आदमी पक्षाचे सुभाष केकान, किसन आव्हाड, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासिर शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक देवा पवार, माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख, चांद मणियार, डॉ. जी. पी. ढाकणे, दिगंबर गाडे, प्रवीण वाघमारे, नानासाहेब पडळकर, पांडुरंग मरकड, श्रीकांत काळोखे, योगेश रासने, संदीप काटे, जुनेद पठाण, गणेश चितळकर, रामदास बर्डे, गणेश दिनकर, आप्पासाहेब बोरुडे आदी सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक नितीन दराडे, नागेश वाघ यांच्यासह पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांनी बंदोबस्त ठेवला.

# कै. विठाबाई किसनराव वैद्य

## मायेचा अखंड झरा, संस्कारांची अमूल्य शिदोरी



**कै. गं. भा. विठाबाई किसनराव वैद्य यांचा जन्म देऊबाई आणि राघोजी बाबा ढगे यांच्या कुटुंबात झाला. पाच भाऊ आणि दोन बहिणींमध्ये त्या सर्वांत धाकट्या होत्या. सन १९५५ मध्ये त्यांचा विवाह किसनराव कारभारी वैद्य यांच्याशी झाला. लग्नानंतर बारा वर्षांनी त्यांना प्रथम अपत्यरत्न प्राप्त झाले. त्यांचे थोरले चिरंजीव बाबासाहेब वैद्य हे नुकतेच मे २०२६ मध्ये मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले. दुसरे चिरंजीव शिवाजी वैद्य हे प्रगतशील शेतकरी आहेत, तर धाकटे चिरंजीव संभाजी वैद्य हे कुंभेफळ येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.**

चार नातू, तीन नाती, तीन पणतू तसेच दीर, जावा, नणंदा, भाचे, भाच्या आणि एक भावजय असा त्यांचा मोठा, प्रेमळ आणि जिव्हाळ्याचा परिवार आहे. त्यांच्या नातवंडांनीही आपल्या कर्तृत्वाने घराण्याचे नाव उज्ज्वल केले आहे. एक नातू मुंबई येथे आरटीओ विभागात कार्यरत आहे, दुसरा नातू नागपूर येथे रिझर्व्ह बँकेत अधिकारी आहे, तर एक नात पुणे येथे आर्किटेक्ट म्हणून कार्यरत आहे.

किसनदादा मुंबई येथे नोकरीला असताना, २०११ पर्यंत गावातील संपूर्ण संसाराची जबाबदारी त्यांनी मोठ्या धैर्याने, कष्टाने आणि हसतमुखाने सांभाळली. कोणतीही अडचण आली तरी त्यांनी कधी तक्रार केली नाही. संसाराच्या प्रत्येक वळणावर त्या आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभ्या राहिल्या.

१६ मे २०२३ रोजी पती किसनदादांच्या निधनानंतर त्या मनाने खूप खचल्या. आयुष्यभर साथ देणारा जीवनसाथी गेल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य जरी कमी झाले, तरी कुटुंबावरील त्यांचे प्रेम कधीच कमी झाले नाही.

स्वतःला मुलगी नाही याचे दुःख त्यांनी कधीच मनात बाळगले नाही. उलट आपल्या तिन्ही सुनांनाच त्यांनी मुलीचे प्रेम दिले. त्यांना सून म्हणून नव्हे, तर स्वतःच्या लेकीप्रमाणे जपले, सांभाळले आणि त्यांच्यावर माया केली.

त्यांच्या घरात आलेला प्रत्येक पाहुणा हा त्यांच्यासाठी देवच असायचा. प्रत्येकाची प्रेमाने विचारपूस करणे, आग्रहाने जेवू घालणे, चहा-पाणी देणे हा त्यांचा स्वभावच होता. एखादा पाहुणा, मला चहा नको, असे म्हणाला, तर त्या हसत म्हणायच्या, मला स्वतःला चहा घ्यायचा आहे, चला तुम्हीही घ्या. त्यांच्या त्या प्रेमळ आग्रहापुढे कुणाचाच नकार टिकत नसे. त्यांच्या घरातून कोणताही पाहुणा कधी उपाशी किंवा नाराज परत गेला नाही.

त्यांचा प्रेमळ, सुस्वभावी, मनमिळावू आणि मायेचा स्वभाव प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करून जायचा. म्हणूनच त्या केवळ आपल्या कुटुंबाच्याच नव्हे, तर गावातील प्रत्येकाच्या लाडक्या होत्या.

भगवान शंकरावरील त्यांची अपार श्रद्धा होती. त्या दर सोमवारी न चुकता उपवास करायच्या. आणि नियतीचाही किती विलक्षण योगायोग! सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी रात्री सव्वा अकरा वाजता, सोमवतीच्या पुण्यपर्वकाळातच त्यांनी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला.

१३ ही तारीख... जणू त्या शांतपणे सांगूनच गेल्या – तेरा साथ हमेशा रहूँगी. पण त्याच दिवशी त्यांनी आपल्या सर्वांची साथ सोडली आणि अनंताच्या प्रवासाला निघून गेल्या.

आज त्या आपल्या डोळ्यांना दिसत नाहीत... त्यांच्या मायेचा हात डोक्यावरून फिरणार नाही... त्यांचा प्रेमळ आवाज पुन्हा ऐकू येणार नाही... पण त्यांनी दिलेले संस्कार, त्यांचे निस्वार्थ प्रेम, त्यांचा जिव्हाळा आणि त्यांच्या आठवणी आपल्या प्रत्येकाच्या हृदयात सदैव जिवंत राहतील.

शरीर थकले होते, पण त्यांची माया कधीच थकली नाही. त्या आज आपल्यात नसल्या, तरी त्यांचे आशीर्वाद, त्यांचे प्रेम आणि त्यांची शिकवण प्रत्येक क्षणी आपल्या सोबत असेल.

अशा या आपल्या सर्वांच्या लाडक्या विठाई आईस, त्यांच्या पवित्र स्मृतीस आणि त्यांच्या ममतेच्या अखंड सागरास शतशः विनम्र अभिवादन.

माणूस आयुष्यातून निघून जातो; पण त्याने दिलेले प्रेम, त्याने केलेले संस्कार आणि त्याच्या आठवणी कधीच संपत नाहीत. विठाई आई, तुम्ही आमच्या हृदयात सदैव जिवंत राहाल.

**भावपूर्ण श्रद्धांजली!**

## शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पसायदान जनलोक अदालत सूर्यानामा'

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्रातील खासगी जागांवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या पात्र झोपडीधारकांना त्यांच्या घरांसह जमिनीचे कायदेशीर मालकीहक्क मिळावेत, तसेच मूळ जमीनमालकांना हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआर किंवा न्याय्य मोबदला देऊन दोन्ही घटकांना न्याय मिळावा, या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पसायदान जनलोक अदालत सूर्यानामा' आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

'मेरे देश में मेरा अपना घर आंदोलन', पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने झोपडपट्टी पुनर्वसन आणि मालकीहक्काबाबत व्यापक धोरण जाहीर करावे, अशी मागणी करण्यात येणार आहे.

देशातील गरीब, कष्टकरी, भूमिहीन, दलित, भटके-विमुक्त, स्थलांतरित मजूर आणि झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित व कायदेशीर निवाऱ्याचा अधिकार मिळावा, या उद्देशाने पीपल्स हेल्पलाईनने २०१४ मध्ये सुरू केलेल्या 'मेरे देश में मेरा अपना घर आंदोलनाला' आता अधिक व्यापक स्वरूप देण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या जनआंदोलनात झोपडपट्टीवासीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

या आंदोलनाद्वारे महाराष्ट्र शासनाने टीडीआर आधारित झोपडपट्टी जमीन-मालकी योजना संपूर्ण राज्यात लागू करावी, खासगी जागांवरील पात्र झोपडीधारकांचे पारदर्शक सर्वेक्षण करून त्यांना कायदेशीर मालकी सनद द्यावी आणि मूळ जमीनमालकांना विकासहक्क किंवा न्याय्य मोबदला प्रदान करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

# SPOT NEWS

## श्री समर्थ विद्यामंदिरच्या 'आनंददायी शनिवार - दप्तरमुक्त शनिवार' उपक्रमातून जीवनमूल्यांची प्रेरणा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक शाळा, सांगळे गल्ली विभाग येथे 'आनंददायी शनिवार – दप्तरमुक्त शनिवार' हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.ग्रुप हेड माय एफएम व दिव्य भास्कर ग्रूप हेड प्रियांका चिखले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी संवाद साधण्यात आला. शिक्षणाबरोबरच संस्कार, व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक विचार आणि जीवनातील यशाचा मंत्र विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्या प्रियांका चिखले यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत आपल्या बालपणापासून पत्रकारिता, शिक्षण, नाटक आणि चित्रपट क्षेत्रातील प्रवास उलगडून सांगितला. जीवनात आलेले संघर्ष, त्यावर मात करण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि सातत्य यामुळेच यश मिळाले, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतः च्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचा सल्ला दिला. मार्गदर्शन करताना प्रियांका चिखले म्हणाल्या, स्वतःची स्वप्ने स्वतःच पूर्ण करा. प्रत्येक स्पर्धेत भाग घ्या, कारण प्रत्येक स्पर्धा आपल्याला नवीन अनुभव देते. आई–वडिलांचे कष्ट नेहमी लक्षात ठेवा आणि त्यांचा सन्मान करा. आजूबाजूच्या वाईट गोष्टींकडे लक्ष न देता चांगल्या गोष्टींचा स्वीकार करा. जीवनात कोणताही शॉर्टकट वापरू नका. व्यसनांच्या आहारी जाऊ नका. आरोग्याची काळजी घ्या. आईच्या हातच्या जेवणाची चव बाहेरच्या कोणत्याही पदार्थाला येत नाही, त्यामुळे घरातील संस्कार आणि कुटुंबाचे महत्त्व जपा. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सामान्य कुटुंबातील मुलांनीही जागतिक स्तरावर यश मिळविल्याची अनेक उदाहरणे सांगितली. त्यांनी एका सामान्य घरातील विद्यार्थ्याने तयार केलेल्या अत्याधुनिक रोबोटचा उल्लेख करून, मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आर्थिक परिस्थिती अडथळा ठरत नाही, तर जिद्द, चिकाटी आणि मेहनत यांची आवश्यकता असते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम याकडेही लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लीना बंगाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. वैशाली मगर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अजय महाजन यांनी केले, तर आभार सतीश मेढे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

## अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शिक्षक व सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर यांच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन श्री समर्थ विद्यामंदिर, सांगळे गल्ली, अहिल्यानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीनिवास म. मुत्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वार्षिक अहवाल, आर्थिक ताळेबंद, लेखापरीक्षण अहवाल, अंदाजपत्रक तसेच संस्थेच्या विविध प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा करून आवश्यक ठरावांना सभेने मंजुरी दिली. सभेच्या प्रारंभी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. त्यानंतर सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षातील अध्यक्षांचा अहवाल, वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, ताळेबंद, नफा–तोटापत्रक, नफा वाटप तसेच सन २०२६–२०२७ या वर्षासाठीचे अंदाजपत्रक सभेपुढे सादर करण्यात आले. त्याचबरोबर हिशोब तपासणीची नियुक्ती, दोष दुरुस्ती अहवाल, उपविधी दुरुस्ती तसेच इतर प्रशासकीय विषयांनाही सभेने मंजुरी दिली. यावेळी मानद सचिव अजय महाजन यांनी संस्थेच्या गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेताना सांगितले की, संस्थेने सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हतेच्या तत्त्वांवर सातत्याने कार्य केले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीतही पतसंस्थेने आपली आर्थिक घडी मजबूत ठेवत सभासदांना आवश्यक त्या सर्व सेवा वेळेत उपलब्ध करून दिल्या. संचालक मंडळ, अधिकारी व सभासद यांच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सातत्याने होत असून भविष्यातही अधिक दर्जेदार आणि आधुनिक सेवा देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. सभेत विविध विषयांवर सभासदांनी सकारात्मक चर्चा करत संस्थेच्या आगामी वाटचालीसंदर्भात सूचना मांडल्या. सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून संस्थेच्या विकासासाठी आवश्यक निर्णय घेण्यात येतील, अशी ग्वाही अध्यक्ष श्रीनिवास मुत्याल यांनी दिली. संस्थेचा कारभार अधिक सक्षम, पारदर्शक आणि सभासदाभिमुख ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. या सभेस ग. धो. कदम, सौ. वि. सु. दगडे, अजय महाजन, श्रीनिवास मुत्याल, बा. स. मस्के, भ. वी. जाधव, श. श. देवडे, स. ध. चौरे, सौ. मी. स. वावळ, गीतांजली शेरकर, लेखनिक सु. द. कुलकर्णी आदी संचालक व पदाधिकारी उपस्थित होते. सभेचे कामकाज शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. सभेनंतर संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक, आदर्श शिक्षक तसेच गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या गौरव सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण लाभले. उपस्थितांनी सत्कारमूर्तींचे टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले.

### पडत्या पावसात सीईओ आनंद भंडारींच्या हस्तक्षेपाने

# सव्वा महिन्यानंतर जांभूळवाडी शाळेचे कुलूप उघडले

### लाभार्थ्याला विहीर मंजुरीचे आदेश । कामात दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील भालगाव परिसरातील जांभूळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला सुमारे सव्वा महिन्यापासून लागलेले कुलूप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्तक्षेपामुळे अखेर उघडण्यात आले. संबंधित शेतकऱ्याशी पडत्या पावसात प्रत्यक्ष संवाद साधत त्यांनी तोडगा काढल्याने उद्यापासून शाळेचे वर्ग पुन्हा नियमितपणे सुरू होणार आहेत.

शाळेसाठी दिलेल्या जागेबाबत प्रशासनाने दिलेले आश्वासन पूर्ण झाले नसल्याचा दावा करत जमीनमालकाने शाळेला कुलूप ठोकले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ग गावातील मंदिरात आणि झाडाखाली भरत होते. तसेच करारातील सर्व्हे क्रमांकाऐवजी अन्य जागेवर शाळेच्या खोल्या बांधल्याचा आरोपही जमीनमालकाने केला होता.



छाया । अनिल खाटेर

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी तालुका दौऱ्यादरम्यान घटनास्थळी भेट देऊन ग्रामस्थ व जमीनमालकाशी चर्चा केली. शाळा बंद ठेवण्याचे कायदेशीर परिणाम समजावून सांगतानाच संबंधित शेतकऱ्याची अडचणही समजून घेत त्यांनी माणुसकीच्या भूमिकेतून तोडगा काढला. संबंधित लाभार्थ्याला शासनाच्या योजनेतून विहीर मंजूर करण्याबाबत पंचायत समिती प्रशासनाला तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानंतर जमीनमालकाने शाळेचे कुलूप उघडण्यास सहमती दर्शविली.

यावेळी भंडारी म्हणाले की, गावातील शाळा ही केवळ इमारत नसून नव्या पिढीला घडविणारे संस्कारकेंद्र आहे. शाळेची निगा राखणे, शैक्षणिक वातावरण निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देणे ही ग्रामस्थ, पालक आणि लोकप्रतिनिधींची सामूहिक जबाबदारी आहे.

दरम्यान, मंगळवारी दिवसभराच्या तालुका दौऱ्यात भंडारी यांनी विविध विकासकामांची पाहणी, आढावा बैठक तसेच प्रलंबित कामांचा आढावा घेतला. तिसगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देऊन तेथील कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करत संबंधित कर्मचाऱ्यांना धारेवर धरले.

यावेळी त्यांनी घरकुल, विहीर आणि इतर शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत होणाऱ्या दिरंगाईबाबतही तीव्र नाराजी व्यक्त केली. लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी केल्याच्या तक्रारी गंभीर असून दोषी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

शासनाच्या योजनांची पारदर्शक अंमलबजावणी करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. पाथर्डी तालुक्यातील विकासकामांबाबत आपण समाधानी नाही. पुढील दौऱ्यापर्यंत कामात सुधारणा झाली नाही किंवा तक्रारींचा वेळेत निपटारा झाला नाही, तर संबंधितांवर कारवाई अटळ आहे, असे भंडारी यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रभारी गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पारनेरच्या न्यू आर्टस् कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांना केंद्र सरकारचा 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' प्रदान

**पारनेर । वीरभूमी –**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाकडून 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' जाहीर झाला असून, पुणे येथे एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.




छाया । भगवान गायकवाड

महाविद्यालयात राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण व कौशल्यपूर्ण उपक्रम, मुलाखतींमधून विद्यार्थ्यांची झालेली उत्कृष्ट निवड, अभ्यासक्रम कार्यशाळा आणि तंत्रज्ञान आधारित चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन यांसारख्या विविध उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर त्यांना हा बहुमान मिळाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उच्च शिक्षणात प्रभावी वापर करून शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा उंचावल्याबद्दल भारत सरकारचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, छउतएढ, छडऊ्र, स्किल इंडिया आणि प्लस ९१ मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार देण्यात आला.

सिद्धार्थराज घरिया यांच्या हस्ते आणि तंत्र शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. सुरेश पाटील व महाराष्ट्र राज्याचे तंत्रशिक्षण संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राचार्य डॉ. आहेर यांनी कोविड काळात ऑनलाइन अध्यापनातून उत्कृष्ट कामगिरी करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वाधिक ई–कॉन्टेन्ट निर्माण करणारे महाविद्यालय म्हणून पारनेर कॉलेजला अग्रेसर ठेवले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाला आहे.

डॉ. रंगनाथ आहेर यांना यापूर्वीही अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले असून, विद्यार्थीकेंद्रित व समाजाभिमुख उपक्रमांमुळे ग्रामीण भागात त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला आहे.

## एस.एस.जी.एम.मध्ये क्रिकेटपटूंसाठी सराव नेट्सची सुविधा उपलब्ध करुन दिली

**कोपरगाव । वीरभूमी–**

रयतशिक्षणसंस्थेच्याएस.एस. जी.एम. महाविद्यालयात ज्युनिअर कॉलेजच्या शालेय तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा तसेच सिनियर कॉलेजच्या विद्यापीठस्तरीय क्रिकेट स्पर्धांच्या तयारीसाठी क्रिकेट सराव नेट्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सराव नेट्सचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन अ‍ॅड. संदीप वर्पे, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य श्री. सुनील गंगुले आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.



छाया । जनार्दन जगताप

उद्घाटनप्रसंगी अ‍ॅड. संदीप वर्पे यांनी, खेळाडूंनी सांघिक भावना व खिलाडूवृत्ती जोपासून सातत्यपूर्ण सराव करण्याचे आवाहन करत खेळाडूंसाठी आधुनिक क्रिकेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. तसेच श्री. सुनील गंगुले यांनीही खेळाडूंनी नियमित व सातत्यपूर्ण सरावातून आपल्या खेळात प्रावीण्य मिळवावे असे आवाहन केले.

प्रमुख उपस्थिती लाभलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, युवा क्रिकेट खेळाडूंना सरावासाठी आवश्यक असणारे साहित्य व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सदैव प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली.

यावेळी वरिष्ठ कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विशाल पवार, क्रीडा शिक्षक श्री. कदम, ज्युनिअर कॉलेज विज्ञान विभागप्रमुख प्रा. गोराणे, वाणिज्य विभागप्रमुख श्री. शांतीलाल अग्रवाल, श्री. रविंद्र हिंगे, क्रिकेट मार्गदर्शक शिंदे, श्री. चव्हाण एस. जे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेवा आणि समर्पण हीच रोटरीची खरी ओळख : डॉ. हरिप्रसाद सोमानी

### रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा

**शेवगाव । वीरभूमी–**

सेवा आणि समर्पण हीच रोटरीची खरी ओळख असून, समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी निःस्वार्थ भावनेने केलेली मानवसेवा हेच रोटरीचे प्रमुख ध्येय आहे, असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमानी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या नव्या कार्यकारिणीच्या पदग्रहण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी डॉ. पुरुषोत्तम बिहाणी यांनी अध्यक्षपदाची, प्रा. डॉ. गजानन लोंढे यांनी सचिवपदाची, तर अशोक लबडे यांनी खजिनदारपदाची सूत्रे स्वीकारली.

डॉ. सोमानी म्हणाले की, 'सेवा परमो धर्म' या विचाराने कार्य करणाऱ्या रोटरीच्या जगभरातील २०० हून अधिक देशांमध्ये शाखा असून सुमारे साडेबारा लाख रोटेरियन समाजसेवेसाठी कार्यरत आहेत. लोभ आणि अहंकाराचा त्याग करून नैतिकतेच्या मार्गाने समाजसेवेचे व्रत स्वीकारल्यास सर्वांगीण प्रगती शक्य आहे. एखाद्याला केलेली मदत इतरांच्या दृष्टीने लहान वाटली तरी गरजू व्यक्तीसाठी ती अनमोल असते. त्यामुळे लोक काय म्हणतील याची पर्वा न करता सेवाभाव जपणे आवश्यक आहे. दान हे केवळ आर्थिक स्वरूपाचे नसून गरजूंना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यातच खरा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी रोटरीचे सहप्रांतपाल डॉ. भागनाथ काटे, मावळते अध्यक्ष युसुफखान पठाण आणि सचिव प्रा. विजय मुधोळकर यांनी गतवर्षातील समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा घेतला. नूतन अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम बिहाणी यांनी आगामी वर्षातील सेवा प्रकल्पांची रूपरेषा मांडली.




छाया । अमोल कराळे

कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते द्वारकानाथ लाहोटी यांनी शेवगाव बसस्थानक परिसरातील पाणपोईच्या नूतनीकरणासाठी रोटरी क्लबला एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या समारंभास सामाजिक कार्यकर्ते शिवाजी भुसारी, नगरसेवक सुनील काकडे, नितीन दहिवाळकर, नीरज लांडे, विनोद मोहिते, सागर फडके, खंडू बुलबुले, संजय फडके, कचरू सारडा, डॉ. सुभाष बाहेती, कारभारी नजन, संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे, केदारेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष माधव काटे, डॉ. सुयोग बाहेती, डॉ. संजय लड्डा, डॉ. विकास बेडके, डॉ. मनीषा लड्डा, सेवानिवृत्त उपप्राचार्य किसन माने, डॉ. आशिष लाहोटी, इनरव्हील क्लबच्या नूतन अध्यक्षा रूपाली तडवळकर, वसुधा सावरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी प्राचार्य दिलीप फलके यांनी केले, तर नूतन सचिव प्रा. डॉ. गजानन लोंढे यांनी आभार मानले.

# अकोलेत युरिया खताची कृत्रिम टंचाई; बफर स्टॉक खुला करण्याची मागणी

### ग्राहक पंचायतीचे तहसीलदारांना निवेदन । आदिवासी शेतकऱ्यांना तातडीने खत उपलब्ध करण्याची मागणी

**अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात खरीप हंगामाच्या तोंडावर युरिया खताची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, काही व्यावसायिकांनी कृत्रिम तुटवडा निर्माण केल्याचा आरोप ग्राहक पंचायत महाराष्ट्रने केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने युरिया खत उपलब्ध करून देण्यात यावे तसेच शासनाच्या ताब्यातील युरियाचा 'बफर स्टॉक' तात्काळ खुला करावा, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, माधवराव तिटमे व सचिव राम रुद्रे यांनी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जून–जुलै महिन्यातील अवकाळी व अतिवृष्टीमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. कर्ज काढून व उसनवारी करून बियाणे खरेदी केलेल्या शेतकऱ्यांना आता भात लागवडीसह सोयाबीन, भुईमूग, बाजरी, मका आदी पिकांसाठी युरिया खताची अत्यंत गरज आहे. मात्र खत उपलब्ध होत नसल्याने पेरणी व भात लागवड उशिराने होत असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी युरिया खताचा पुरेसा पुरवठा तातडीने करावा आणि शासनाच्या ताब्यातील बफर स्टॉक त्वरित खुला करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले, सचिव राम रुद्रे, रामदास पांडे, अनंत घाणे, गंगाराम धिंदळे, मोहन मुंढे, सुरेश गबाले, दत्तात्रय मुठे, अशोक उघडे, पांडूरंग पथवे, रामदास पवार, राजेंद्र लहामगे, सुशांत वाकचौरे, साहेबराव दातखिळे, ओंकार धुमाळ, मुकेश बैरागी, नवनाथ आवारी, भाऊसाहेब वाकचौरे, गणपत थिगळे, प्रदीप हासे, भाऊसाहेब वाळूंज, ड. राम भांगरे, ड. दीपक शेटे, रामहारी तिकांडे, ज्ञानेश्वर पुंडे, दत्ता शेटे, कैलास तळेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या निवेदनाच्या प्रती जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अहिल्यानगर आणि तालुका कृषी अधिकारी, अकोले यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.




छाया । विद्याचंद्र सातपुते

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# राहाता व्यापारी संकुलाच्या नूतनीकरणाला प्रशासकीय मान्यता

## छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलात आधुनिक सुविधा । व्यापारी व नागरिकांना मिळणार दिलासा

**● राहाता । वीरभूमी –**
राहाता नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलाच्या नूतनीकरणास तसेच उर्वरित विकासकामांना शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या निर्णयामुळे व्यापारी संकुलाचे रूपडे बदलण्यास मदत होणार असून व्यापारी व नागरिकांना अधिक दर्जेदार आणि आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.



याबाबत माहिती देताना भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून राहाता शहराच्या सर्वांगीण विकासाला सातत्याने गती मिळत आहे. शहराच्या गरजा लक्षात घेऊन विविध विकासकामांना प्राधान्याने मंजुरी मिळवून दिली जात असून, त्याचाच एक भाग म्हणून व्यापारी संकुलाच्या नूतनीकरणास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राहाता नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांच्या पुढाकारातून या विकासकामाला गती मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

या कामांतर्गत व्यापारी संकुलातील आवश्यक दुरुस्ती, नूतनीकरण तसेच प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांना अधिक सुरक्षित, सुसज्ज व आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. तसेच संकुलात येणाऱ्या नागरिकांनाही अधिक चांगल्या सुविधा मिळणार असून शहराच्या व्यापारी विकासाला नवी चालना मिळणार आहे.

प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाहीला गती देण्यात येणार असून आवश्यक प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. या विकासकामामुळे राहाता शहराच्या पायाभूत सुविधांना बळ मिळून शहराच्या आर्थिक व व्यावसायिक प्रगतीलाही चालना मिळेल, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

# 'स्वच्छ वारी... सुंदर वारी'चा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपची एकदिवसीय पंढरी वारी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय पंढरी वारी उत्साह, भक्तिभाव आणि समाजप्रबोधनाच्या वातावरणात पार पडली. भक्ती, सेवा, सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संगम या वारीतून सर्व सदस्यांना अनुभवायला मिळाला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरेल स्वरांत पंढरपूरकडे रवाना झालेल्या या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी स्वच्छ वारी... सुंदर वारी हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

भिंगार येथील श्री रोकडेश्वर हनुमान मंदिरात महाआरती करून हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य बसने पंढरपूरकडे रवाना झाले. संपूर्ण प्रवासात विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. ज्ञानोबा-तुकोबा, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या गजरात वारकरी भक्तिभावाने तल्लीन झाले होते.

या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण वारीदरम्यान स्वच्छतेचा संदेश देत ठिकठिकाणी स्वच्छता करण्यात आली. पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरी परिसरात सदस्यांनी हातात झाडू घेत स्वच्छता अभियान राबविले. परिसरातील प्लास्टिक, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

या भक्तिमय आणि सेवाभावी वारीत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विकास भिंगारदिवे, रामनाथ गर्जे, सतीश सपकाळ, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, डॉ. अतुल मडावी, राजेंद्र पांढरे, अशोक लोंढे, अशोक दळवी, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, सुहास देवराईकर, मच्छिंद्र बेरड, रमेश साके, किसन गुंजाळ, राजेश तनपुरे, संतोष चोपडा, राजकुमार मोरे, उषाताई ठोकळ, सुरेखा आमले, नीता देवराईकर, उमा सोनसळे, आशाताई गर्जे, अश्विनी थोरात, रजनीताई परदेशी, लक्ष्मीताई गायकवाड, अनिता सोनवणे, योगिताताई, अर्चना खर्से, वर्षा काळे, रजनी परदेशी, निमल भिंगारदिवे, देविदास गंडाळ, विलास शिंदे, शब्बीर शेख, गोकुळ भांगे, दर्श गोंधळे, राजाराम थोरात, दत्तात्रय गोंधळे, हिरेंद्र मिश्रा, अनिल बनसोडे आदी सहभागी झाले होते.

# पारनेरातील हॉटेलच्या मजल्यावर सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा; सहा जण ताब्यात

**● पारनेर । वीरभूमी –**
शहरातील मार्केट परिसरात सुरू असलेल्या तिरट जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत सहा जणांना रंगेहाथ ताब्यात घेतले. आरोपींकडून ४२ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, त्यामुळे पारनेर शहरात सुरू असलेल्या अवैध जुगार व्यवसायावर पोलिसांनी मोठा आघात केला आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील जुगार, मटका, दारू विक्रीसह विविध अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्यासह विशेष पथकाची नियुक्ती करून अवैध धंद्यांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या.

रविवारी (दि. १९) स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. पारनेर मार्केट परिसरातील 'राजू बांबू हाऊस' हॉटेलच्या वरच्या मजल्यावर काही जण तिरट नावाचा हार-जीतीचा जुगार पत्त्यांवर पैसे लावून खेळत असल्याचे समजताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी हॉटेलच्या वरच्या मजल्यावर अचानक छापा टाकला असता काही जण पैशांची हार-जीत लावून तिरट जुगार खेळत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांनी आपली ओळख सांगितली. या कारवाईत अजीम अमीन शेख (५७), तुकाराम दत्तू चव्हाण (४८), मोबीन अब्दुलरहीम शेख (४३), राहुल उर्फ सुनील पोपट औटी (२८), सुहास काशीनाथ मेहर (३२) आणि मज्जीद अमीन शेख (५२) या सहा जणांना ताब्यात घेण्यात आले.

कारवाईदरम्यान आरोपींकडून जुगारासाठी वापरण्यात येत असलेली ४२ हजार रुपयांची रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली. जुगार खेळताना व खेळविताना आरोपी प्रत्यक्ष आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पारनेर पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नियोजनातून पार पडली. पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्यासह पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, भीमराज खर्से, राहुल डोके, बाळासाहेब गुंजाळ आणि अमोल आजबे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

जिल्ह्यातील जुगार, मटका व इतर अवैध धंद्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेची मोहीम आणखी तीव्र करण्यात आली असून, अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलीस सूत्रांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

# शेवगाव आगारात ५ नव्या 'राजमाता जिजाऊ' बस दाखल

## आमदार मोनिका राजळे यांच्या पाठपुराव्याला यश । ग्रामीण प्रवाशांना आधुनिक सुविधांचा लाभ

**● शेवगाव । वीरभूमी –**
आषाढी एकादशीपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शेवगाव आगारात ५ नव्या बीएस-६ 'राजमाता जिजाऊ' बस दाखल झाल्या आहेत. या बस उद्यापासून नियमित प्रवासी सेवेत दाखल होणार असून ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे.



शेवगाव व पाथर्डी आगारासाठी प्रत्येकी १० नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार मोनिका राजळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत पहिल्या टप्प्यात शेवगाव आगारासाठी ५ बस मंजूर करण्यात आल्या असून त्या आता आगारात दाखल झाल्या आहेत. उर्वरित बसही दोन्ही आगारांसाठी लवकरच उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले.

सध्या शेवगाव आगारात ५२ बस कार्यरत असून या बसमधून दरवर्षी सुमारे सहा लाख प्रवासी प्रवास करतात. अनेक बस जुन्या झाल्याने प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन नवीन बस उपलब्ध करून देण्यासाठी आमदार राजळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. यापूर्वीही त्यांच्या प्रयत्नांतून बीएस-६ प्रकारातील अशोक लेलँड कंपनीच्या १० नवीन बस शेवगाव आगाराला मिळाल्या होत्या. त्यापैकी ११ फेब्रुवारी २०२५ रोजी ५ बस, तर ५ मार्च २०२५ रोजी आणखी ५ बस आगारात दाखल झाल्या होत्या. नव्याने आलेल्या ५ बसमुळे आगाराच्या ताफ्यात आणखी भर पडली आहे.

आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून शेवगाव आगाराचे शेड व बसस्थानकाचे काम पूर्णत्वास आले आहे. नव्या 'राजमाता जिजाऊ' बीएस-६ बस सुरक्षितता, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून विशेषतः ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयी लक्षात घेऊन तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे नवीन बस उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानले. तसेच उर्वरित बसही लवकरच उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

नवीन बस आगारात दाखल झाल्याने प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण असून, आमदार मोनिका राजळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेवगाव आगाराच्या सुविधांमध्ये होत असलेल्या वाढीबद्दल प्रवाशांनी समाधान व्यक्त केले.

# केडगाव मधून श्री गणेश पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
केडगाव येथून सालाबाद प्रमाणे श्री गणेश पायी दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पूजन होवून दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. ज्ञानोबा-तुकोबा, माऊली... माऊली... या जयघोषात टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय सोहळा रंगला होता.

दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक सुजय मोहिते, नंदकुमार बोरुडे, दिंडी चालक ह.भ.प. गणेशानंद महाराज शेंडे, सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे म्हणाले की, केडगाव परिसरातील रभाजी नगर येथून ही दिंडी प्रस्थान करते. दिंडी अत्यंत शिस्तबद्ध असून, आचार विचार व उच्चार या आधारावर भाविक भक्त चालत राहतात. वारकरी संप्रदायासाठी आस्था असणारे ठिकाण पंढरपूर याकडे जाण्याची गोडी आणखी वाढण्यासाठी आयोजक नेहमी कटिबद्ध आहे. या दिंडीमध्ये सर्वात जास्त महिलांचा सहभाग असतो. महिलांसाठी सर्व स्वतंत्र व्यवस्था असून, इतर भाविक देखील दिंडीत भक्तीचा आनंद घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीगोंद्यात एसआयआर प्रक्रियेत हलगर्जीपणाचा आरोप

## कर्मचाऱ्यांकडून बनावट सह्यांचा धक्कादायक प्रकार? मतदार यादीतील नावांवर गदा येण्याची भीती

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
मतदार यादीच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (एस आय आर) अर्थात विशेष सखोल पुनरावलोकन मोहिमेदरम्यान श्रीगोंदा तालुक्यात काही ठिकाणी प्रशासकीय हलगर्जीपणा होत असल्याचे आरोप समोर येत आहेत. वेळेअभावी किंवा कामाचा ताण कमी करण्यासाठी काही ठिकाणी मतदान केंद्र स्तर अधिकारी (बी एल ओ) आणि त्यांच्या मदतीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्ष मतदारांच्या घरी न जाता मोबाईलवरून माहिती घेऊन अर्ज भरले जात असल्याची चर्चा आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे काही ठिकाणी अर्जदाराच्या स्वाक्षरीऐवजी कर्मचाऱ्यांनीच स्वाक्षऱ्या केल्याचा आरोप होत असून, या प्रकारामुळे पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



निवडणूक आयोगाने मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी एसआयआर मोहीम सुरू केली आहे. या प्रक्रियेत प्रत्येक मतदाराची माहिती पडताळून आवश्यक अर्ज भरून घेणे अपेक्षित आहे. श्रीगोंदा तालुक्यात अनेक गावांमध्ये बीएलओ नियुक्त करण्यात आले असून, त्यांना मदतनीस म्हणून अंगणवाडी सेविका व मदतनीस कार्यरत आहेत.

मात्र, काही गावांतील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष भेट न देता केवळ फोनवर माहिती घेऊन अर्ज भरले जात आहेत. काही ठिकाणी मतदारांच्या स्वाक्षऱ्या न घेता कर्मचाऱ्यांनीच अर्जांवर सह्या केल्याचा आरोप होत आहे. जर या आरोपांमध्ये तथ्य आढळले, तर संबंधित अर्जांची वैधता आणि त्याआधारे होणाऱ्या मतदार नोंदणी प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते.

### मतदाराच्या सह्या कर्मचाऱ्यांनी करू नयेत; तक्रार आल्यास कारवाई : गौरी सावंत

■ याबाबत दैनिक वीरभूमीचे तालुका प्रतिनिधी यांनी श्रीगोंदा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी गौरी सावंत यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या, एसआयआर फॉर्म भरताना कुटुंबातील प्रौढ व्यक्तीने माहिती देऊन स्वाक्षरी केली तरी नियमांनुसार चालते. मात्र, कोणत्याही निवडणूक कर्मचाऱ्याने स्वतः मतदाराच्या वतीने स्वाक्षरी करू नये. असा प्रकार कुठे आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच या संदर्भात सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना पुन्हा स्पष्ट सूचना दिल्या जातील, असे श्रीगोंदा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी गौरी सावंत यांनी सांगितले.

मतदार यादीतील चुकीची माहिती, अपूर्ण अर्ज किंवा प्रक्रियेतील त्रुटींमुळे पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नंतर नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी नागरिकांना मोठ्या प्रशासकीय प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे एसआयआरसारखी महत्त्वाची मोहीम अत्यंत पारदर्शक आणि नियमांनुसार राबविण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

प्रत्येक मतदाराने स्वतःची माहिती तपासून अर्जावर स्वतः किंवा नियमानुसार कुटुंबातील प्रौढ सदस्यामार्फतच स्वाक्षरी झाल्याची खात्री करून घ्यावी. कोणत्याही कर्मचाऱ्याने स्वतःहून मतदाराच्या नावाने स्वाक्षरी करणे हा गंभीर प्रकार ठरू शकतो. अशा घटना निदर्शनास आल्यास संबंधितांनी तातडीने निवडणूक प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहनही नागरिकांकडून केले जात आहे.

# अकोले-एसएमबीटी हॉस्पिटल मोफत बससेवेचा शुभारंभ

## ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना मोठा दिलासा । आठवड्यातून तीन दिवस विनामूल्य प्रवासाची सुविधा

**● अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील रुग्णांना उपचारासाठी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ये-जा करणे अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने अकोले-एसएमबीटी हॉस्पिटल मोफत बससेवेचा शुभारंभ मंगळवारी आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते करण्यात आला. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागातील रुग्णांसाठी ही सेवा महत्त्वाची ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी अकोले तालुक्यातील विविध गावांमधून दररोज मोठ्या संख्येने रुग्ण येत असतात. आर्थिक अडचणी, अपुरी वाहतूक व्यवस्था आणि खासगी वाहनांचा वाढता खर्च यामुळे अनेकांना वेळेवर उपचारासाठी पोहोचणे कठीण जात होते. ही बाब लक्षात घेऊन रुग्णांना सुरक्षित, वेळेवर आणि विनामूल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही बससेवा सुरू करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे उपचारासाठी होणारा प्रवासाचा खर्च कमी होणार असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच डायलिसिस, शस्त्रक्रिया, ओपीडी, तपासणी आणि वारंवार उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ही बस दर मंगळवार, गुरुवार आणि शनिवार सकाळी ८ वाजता नियमित धावणार असून तालुक्यातील गरजू रुग्णांना या सेवेचा लाभ घेता येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेशी जोडण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

यावेळी संदीप गायकवाड, लक्ष्मीकांत वारंघुसे, अक्षय आभाळे, हरिभाऊ फापाळे, प्रशांत बंदावणे, महिपाल देशमुख, डॉ. संदीप कडलग, दत्ता नवले, पराग वाडगे, अंकुश वैद्य, सचिन पवार, डॉ. आसिफ तांबोळी, अमोल सावंत, रियाज शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, वैद्यकीय अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या मोफत बससेवेचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

# रामवाडी झोपडपट्टीत एसआयआरचे ८० टक्के काम पूर्ण

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण अभियानांतर्गत अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामवाडी परिसरात तब्बल ८० टक्के पडताळणीचे काम पूर्ण करण्यात यश आले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि विविध अडचणींवर मात करत हे काम यशस्वी करणारे बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांच्या कार्याचा रामवाडीतील नागरिकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

रामवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा वेचक, असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारी मजूर, ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे वास्तव्यास आहेत. येथील बहुतांश नागरिक सकाळी लवकर कामासाठी घराबाहेर पडतात आणि रात्री उशिरा घरी परततात. त्यामुळे विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेअंतर्गत त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पडताळणी करणे हे मोठे आव्हान ठरत होते.

याशिवाय एसआयआर मोहिमेबाबत विविध अफवा आणि गैरसमज पसरल्याने अनेक नागरिक संभ्रमात होते. काही नागरिकांना पडताळणी प्रक्रियेबाबत चुकीची माहिती मिळाल्यामुळे ते सहकार्य करण्यासही साशंक होते. अशा परिस्थितीत बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांनी संयम, समजूतदारपणा आणि संवेदनशीलतेने प्रत्येक नागरिकाशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करून योग्य माहिती दिली तसेच मतदानाचा हक्क आणि मतदार यादीतील नावाचे महत्त्व समजावून सांगत नागरिकांचा विश्वास संपादन केला.